**ठळक बातम्या**

- महत्त्वाची खनिजं, तंत्रज्ञान आणि पुरवठा साखळीचा वापर कोणत्याही देशाने स्वार्थासाठी किंवा सशस्त्रीकरणासाठी करु नये असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आवाहन

- बिहारमधे मतदारयाद्यांचं सखोल पुनरिक्षण करण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालय सुनावणी करणार

- महाराष्ट्रात शिधापत्रिकेवर मिळणाऱ्या तांदळाच्या खरेदी आणि वितरणात भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी करून अधिवेशन संपण्यापूर्वी अहवाल सादर करण्याचे विधानसभा अध्यक्षांचे निर्देश

**आणि**

- यमनच्या होदेइदाह प्रांतात लाल समुद्रातल्या अनेक बंदरांवर इस्त्राएलचे हवाई हल्ले

**<><><><><>**

महत्त्वाच्या खनिजांचा तसंच तंत्रज्ञान आणि पुरवठा साखळीचा वापर कोणत्याही देशाने स्वार्थासाठी किंवा सशस्त्रीकरणासाठी करु नये असं आवाहन प्रधानंत्री नरेद्र मोदी यांनी केलं आहे. ब्रिक्स परिषदेनिमित्त रिओ द जानिरो मधे आयोजित संवाद सत्रात ते बोलत होते. तात्परुत्या स्वरुपाचे निर्णय घेण्याऐवजी दूरगामी परिणामाचा विचार करुन निर्णय घेणं गरजेचं आहे असं ते म्हणाले. लोककल्याणासाठी या सर्व गोष्टींचा वापर झाला पाहिजे, मानवी मूल्यांच्या संवर्धनासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आवश्यक असल्याची भारताची भूमिका आहे असं ते म्हणाले

**<><><><><>**

ब्रिक्स परिषदेचं अध्यक्षपद पुढच्या वर्षी भारताकडे असणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा यंदाच्या परिषदेतला सहभाग आणि ब्राझिल दौरा महत्त्वाचा असल्याचं केंद्रीय आर्थिक व्यवहार विभागाचे सचिव दामू रवी यांनी सांगितलं. ब्राझिलमधे रिओ द जानिरो इथं ते पत्रकार परिषदेत बोलत होते. जागतिक पातळीवर काम करणाऱ्या संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, इत्यादी संस्थांचे हात अधिक बळकट करण्याची गरज असल्याचा मुद्दा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यंदाच्या परिषदेत जोरकसपणे मांडला असं रवी म्हणाले.

<><><><><>

ब्राझीलमध्ये रिओ द जेनेरिओ इथं सुरु असलेल्या ब्रिक्स शिखर परिषदेत, ब्रिक्स राष्ट्रांनी सर्व प्रकारच्या दहशतवादाचा सामना करण्यासाठी आपली वचनबद्धता दर्शवली. यावेळी सर्व राष्ट्रांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला. या परिषदेत शांतता आणि सुरक्षितता यावरील सत्राच्या सुरवातीला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दहशतवादाचा मुद्दा उपस्थित करुन दहशतवाद हा मानवतेवरची खोल जखम असल्यांचं नमूद केलं. दहशतवादाचा निषेध ही केवळ सोय नाही, ती आपली मूल्यप्रणाली असली पाहिजे, भारत युद्धात नव्हे, तर संवादात विश्वास ठेवतो, असं सांगून मोदी यांनी, गांधी-विवेकानंद-गौतम बुद्धांच्या भारताची भूमिका अधोरेखित केली.

<><><><><>

बिहारमधे मतदारयाद्यांचं सखोल पुनरिक्षण करण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालय सुनावणी करणार आहे. येत्या गुरुवारी ही सुनावणी होईल. निवडणुकांना सामोरं जात असलेल्या राज्यांमधेच केवळ असं पुनरिक्षण केलं जात असल्याचा आरोप याचिकेत आहे.

**<><><><><>**

कारगिल युद्धावेळी अतुलनीय शौर्य दाखवत सर्वोच्च बलिदान देणारे कॅप्टन विक्रम बत्रा यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज देश त्यांना आदरांजली वाहत आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी कॅप्टन बत्रा यांना समाज माध्यमावर आदरांजली वाहिली आहे. कारगिल युद्धा दरम्यान कॅप्टन बत्रा यांनी दाखवलेलं शौर्य आणि बलिदान हे देशसेवेतलं एक गौरवशाली उदाहरण असल्याचं ते आपल्या संदेशात म्हटलं आहे.
१९९९मध्ये झालेल्या कारगिल युद्धात कॅप्टन विक्रम बत्रा यांनी नेतृत्व करत शत्रुच्या चौक्या काबीज केल्या होत्या. या मोहिमेत देशाच्या सीमेचं रक्षण करताना ते शहीद झाले. कॅप्टन विक्रम बत्रा यांना मरणोत्तर परमवीर चक्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं.

**<><><><><>**

श्री अमरनाथ यात्रेसाठी जम्मूतील भगवती नगर यात्री निवास बेस कॅम्प इथून आज सकाळी आठ हजार ६५० भाविकांची सहावी तुकडी रवाना झाली. यापैकी ३ हजार ४८६ भाविक बालटाल मार्गाने आणि ५ हजार ११९ भाविक पहलगाम मार्गाने पवित्र गुहेत जातील. यंदा या यात्रेदरम्यान कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात शिधापत्रिकेवर मिळणाऱ्या तांदळाच्या खरेदी आणि वितरणात भ्रष्टाचार होत असल्याच्या आरोपाची चौकशी करून अधिवेशन संपण्यापूर्वी तो अहवाल सादर करावा असा आदेश विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज केली. काँग्रेसच्या नाना पटोले यांनी काही दिवसांपूर्वी हा आरोप केला होता. त्यावरच्या प्रश्नादरम्यान अध्यक्षांनी या सूचना केल्या.

**नंदुरबार** जिल्ह्यात अक्कलकुवा इथे सुरू असलेल्या तेल भेसळीप्रकरणी संबंधित कारखाना तातडीने बंद करून संबंधित अन्न आणि औषध प्रशासन सह

आयुक्त तसेच सहाय्यक आयुक्त यांना निलंबित करण्याची घोषणा या विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी केली. याबाबतचा मूळ प्रश्न आमश्या पाडवी यांनी उपस्थित केला होता, त्यावर समीर कुणावार यांनी उपप्रश्न विचारले. संबंधित कंपनी वारंवार तेल भेसळप्रकरणी दोषी आढळून आली आहे, सोयाबीन, शेंगदाणा तेल यांचे नव्याने घेण्यात आलेले नमुने देखील भेसळयुक्त आढळून आले आहेत, असं आढळल्यावर ही कंपनी अधिकाऱ्यांनी तातडीने बंद करण्याची कारवाई करणे आवश्यक होते मात्र ते न केल्यानं त्यांना निलंबित करण्याची घोषणा झिरवाळ यांनी केली.

**मुंबईतल्या** उमरखाडी पुनर्विकास समितीच्या ८१ इमारती पुनर्विकसित करण्यासाठी वास्तुविशारद आणि अर्थविषयक विशेष व्यक्ती नेमण्यात आल्या आहेत, त्यांचा अहवाल तीन महिन्यात अपेक्षित असून त्यानंतर यावर निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती प्रभारी मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली, याबाबतचा मूळ प्रश्न हरीश पिंपळे यांनी उपस्थित केला होता, त्यावर अमिन पटेल यांनी उपप्रश्न विचारले.

दरम्यान, सभागृहाचे दिवंगत सदस्य अशोक पाटील डोणगावकर आणि लहानु अहिरे यांच्या निधनाबद्दल त्यांना आदरांजली वाहण्यात आली, अध्यक्षांनी याबाबतचा प्रस्ताव मांडला.

**<><><><>**

देशाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी काल मुंबईत गिरगाव इथल्या चिकित्सक समूह शिरोळकर विद्यालयाला भेट देऊन आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. मातृभाषेतून शिक्षण घेतल्यामुळे विषयांची समज अधिक पक्की होते, शिक्षणाबरोबरच संस्कारही रुजतात, हेच संस्कार आयुष्यभर साथ देतात, असा आत्मविश्वासही गवई यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला.

**<><><><>**

मुंबई सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर जप्तीच्या तीन मोठ्या प्रकरणांमध्ये चार जणांना अटक केली. जप्तीमध्ये गांजा, तस्करी केलेले जीवंत आणि मृत वन्यजीव, आणि सोने यांचा समावेश असून, याची एकत्रित किंमत ११ कोटी रुपयांहून अधिक आहे. सीमा शुल्क अधिकाऱ्यांनी बँकॉकहून आलेल्या एका प्रवाशाकडून सुमारे नऊ किलो गांजा, तर दुसऱ्या प्रवाशाकडून तीन प्रजातींचे ३० जीवंत तर १४ मृत वन्यजीवांचे नमुने आढळले. तर तिसऱ्या घटनेत दुबईहून येणाऱ्या दोन प्रवाशांकडून सुमारे दीड किलो सोनं जप्त करण्यात आलं.

**<><><><>**

इस्राएलनं काल मध्यरात्रीच्या सुमारास यमनच्या होदेइदाह प्रांतात लाल समुद्रातल्या अनेक बंदरांवर हवाई हल्ले केले. हा भाग तत्काळ रिकामा करण्याबाबत समाज माध्यमावर इशारा दिल्यानंतर काही वेळातच इस्राएलच्या सैन्याकडून हवाई हल्ले करण्यात आले. या हल्ल्यात हूतींचे गड मानले गेलेल्या होदेइदाह, अस सालिफ अशा भागांना लक्ष्य करण्यात आल्याचं इस्राएलच्या संरक्षण मंत्र्यांनी सांगितलं. २०२३ मध्ये हे प्रदेश हूतींनी ताब्यात घेतले होते. इराणमधून शस्त्रांची आयात करण्यासाठी या बंदरांचा वापर केला जात होता.

**<><><><>**

विम्बल्डन टेनिस स्पर्धेत भारताचा युकी भांब्री, त्याचा अमेरिकन साथीदार रॉबर्ट गॅलोवेसह आज पुरुष दुहेरीच्या तिसऱ्या फेरीत खेळेल. भांब्री हा एकमेव भारतीय खेळाडू अजून स्पर्धेत टिकून आहे. दरम्यान, गतविजेता कार्लोस अल्काराझने आंद्रे रुबलेव्हला हरवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला, तर महिलांच्या स्पर्धेत अव्वल मानांकित आरिना सबालेन्काने एलिस मर्टेन्सवर सरळ सेटमध्ये विजय मिळवला. अल्काराझने १४ व्या मानांकित रुबलेव्हविरुद्ध पहिला सेट हरल्या नंतर उत्कृष्ठ खेळ करत  ६-७, ६-३, ६-४, ६-४ असा विजय मिळवला.

**<><><><><>**

इंग्लंडमधल्या बर्मिंगहॅम इथं झालेल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट स्पर्धेचा दूसरा सामना भारतानं ३३६ धावांनी जिंकून ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. या विजयामुळे भारतानं  मालिकेत १-१ बरोबरी साधली आहे. धावांचा विचार करता भारताचा हा परदेशातील सर्वांत मोठा विजय ठरला आहे. तर भारतानं प्रथमच कसोटीत १ हजार पेक्षा धावा केल्या आहेत. काल सामन्याच्या पाचव्या आणि शेवटच्या दिवशी इंग्लंडने ३बाद ७२ धावांवरून डाव सुरू केल्यानंतर विजयासाठी ६०८ धावांचं उद्दिष्ट गाठताना यजमान संघाचा डाव २७१ धावांवर आटोपला. आकाशदीपने दुसऱ्या डावात ६  बळी घेत या कसोटीत एकंदर १० बळी घेतले. या सामन्यात दोन शतक ठोकणाऱ्या आणि अशी कामगिरी करणारा तिसरा भारतीय फलंदाज ठरलेल्या शुभमन गिल याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. कोणत्याही आशियाई संघाने बर्मिंगहॅममध्ये कसोटी जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे. तिसरा कसोटी सामना येत्या १० जुलैपासून लंडनमधल्या लॉर्ड्स मैदानावर होणार आहे.

**//<><><><><>//**